<u>निवडसूची सन २०१३-१४</u>
पोलीस अधिक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्र: रापोसे-०७१४/प्र.क्र.१४५/पोल-१अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- ३० जानेवारी, २०१६.

<u>वाचा:-</u> पोलीस महासंचालक यांचे पत्र क्र. पोमसं/१/७४३०/नि.सू.-२०१३-१४/पो.अधी./ ३४५/१३, दि. २९.१.२०१६.

<u>शासन आदेश</u> :-

पोलीस अधिक्षक / पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१३-१४ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले पोलीस उप अधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या दर्जाचे अधिकारी श्री. दिलीप शंकरवार, उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग, जिल्हा रायगड यांना याद्वारे मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठा पुढील क्रमांक ४६३/२०१५ Jud. २३८७/१५, दि.२७.११.२०१५ अन्वये दाखल करण्यात आलेल्या अपील अर्जाच्या अधीन राहून पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

२. श्री. दिलीप शंकरवार यांच्याविरुध्दच्या उपरोक्त न्यायालयीन प्रकरणाव्यतिरिक्त त्यांच्याविरुध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

३. श्री. दिलीप शंकरवार हे दि. ३१.१.२०१६ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने, त्यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावर पदस्थापना देण्यात यावी.

४. सदर पदोन्नतीवरील नेमणूक, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र:२७९७/२०१५ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१६०११४१६०१०४०२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila
Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2016.01.30 18:04:04 +05'30'

(चारुशीला तांबेकर)
सह सचिव, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतिलिपि,

१) महालेखापाल - १/२, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. राज्यमंत्री (गृह) /(ग्रामीण/शहरे)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) पोलीस अधिक्षक, रायगड.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११) सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१२), मंत्रालय, मुंबई,
१२) संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत)
१३) निवडनस्ती (कार्या. पोल-१अ).